महाराष्ट्र चित्रपट,रंगभमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.

---

"प्रशासन समन्वयक" या पदासाठी जाहिरात.

महामंडळाचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालण्यासाठी शासनाने शासन निर्णय क्र.गोचिन-२००९/प्र.क्र.१११/सां.का.१, दि.३०.०९.२००९ अन्वये २४९ पदांचा आकृतिबंध मंजूर केला आहे. यापैकी १८ पदे व्यपगत झाल्याने २३१ पदे मंजूर असून सद्यस्थितीत विविध सवंर्गातील फक्त ७२ पदे कार्यरत असून १५९ पदे रिक्त आहेत. कार्यरत पदांमध्ये बहुतांश कर्मचारी चतुर्थ श्रेणीतील व तांत्रिक स्वरुपाचे काम करणारे आहेत. तसेच कार्यरत असलेल्या कर्मचारी नियतवयोमानुसार सेवा निवृत्त होत असल्याने दैनंदिन कार्यालयीन कामकाज करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी पडत आहे.

महामंडळातील सद्यास्थितीतील कामाचे स्वरुप व कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेवून सरळसेवेने भरती होईपर्यंत किंवा आवश्यतेनुसार शासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी ११ महिन्याच्या कालावधीसाठी सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुलाखतीद्वारे करार पद्धतीने भरण्यासाठी खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे:-

| अ. क्र | पदाचे नाव | पद संख्या | अर्हता | पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशासन समन्वयक | १ | सेवानिवृत्त - अवर सचिव / कक्ष अधिकारी पदावरून सेवानिवृत्त अधिकारी | महामंडळातील आस्थापने विषयक बाबी, सेवा प्रवेश नियम , पदांचा आढावा, सेवा-शर्ती नियम, अनुकंपा, बिंदू नियमावली, आश्वासित प्रगती योजना, सरळसेवा भरती, पदोन्नती आवश्यकते प्रमाणे इतर इ. विवक्षित कामे व वरिष्ठांनी वेळोवेळी सुचविले कामे. |

**१. अर्हता:-** अ) शासन सेवेतील जानेवारी २०२२ ते जुलै २०२४ या कालावधीत सेवा निवृत्त झालेले अधिकारी.

ब) शारिरीक व बौध्दिकदृष्ट्या कार्यक्षम असणे आवश्यक.

क) मराठी, हिंदी आणि इंग्रजी लिहिण्या व वाचण्याची क्षमता आवश्यक.

ड) कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी झालेली, प्रलंबित अथवा प्रस्तावित नसावी.

**२. वित्तलब्धी :-** सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ नुसार

३. अर्जाचा नमुना व इतर अनुषंगीक बाबी महामंडळाच्या www.filmcitymumbai.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वरील अर्हता धारण करण्याऱ्या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्रे, सेवेत असताना सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाच्या पुराव्यार्थ आवश्यक त्या (उदा. सेवा निवृत्ती वेळेचे वेतन प्रमाणपत्र व निवृत्ती वेतन प्रमाणपत्र) साक्षांकित कागदपत्रासह विहीत नमुन्यात खालील पत्यावर डाकद्वारे किंवा filmcitycao@gmail.com या इमेल आयडीवर ऑन लाईन दि.२५.०९.२०२४ सायंकाळी ५ वाजे पर्यंत अर्ज पोहचेल असा करावा.

प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार छाननी करुन पात्र उमेदवारांपैकी उमेदवारांचा अनुभव व वयोमर्यादा विचारात घेऊन सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व हक्क महामंडळ राखून ठेवत आहेत. मुलाखतीचा दिनांक व वेळ पात्र उमेदारांना यथावकाश कळविण्यात येईल.

स्वाक्षरी,

व्यवस्थापकीय संचालक

म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

"प्रशासन समन्वयक" या पदासाठी अर्जाचा नमुना :-

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | |
| २ | अर्ज करत असलेल्या पदाचे नाव | |
| ३ | जन्म तारीख | |
| ४ | पत्रव्यवहारासाठीचा पत्ता | |
| ५ | ई- मेल | |
| ६ | दूरध्वनी / मोबाईल क्रमांक | |
| ७ | शैक्षणिक अर्हता | |
| ८ | सेवा निवृत्ती दिनांक व सेवा कालावधी | |
| ९ | निवृत्तीच्यावेळी कार्यरत असलेल्या कार्यालयाचा तपशील व कालावधी | |
| १० | सेवा निवृत्तीच्या वेळी  धारण केलेले पद | |
| ११ | विभागीय चौकशी झालेली / प्रस्तावित / प्रलंबित आहे किंवा कसे याचा तपशिल | |
| १२ | सेवा निवृत्ती वेळेचे वेतन प्रमाणपत्र व निवृत्ती वेतन मिळत असल्यास निवृत्ती वेतन प्रमाणपत्र | |

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी